मुंबई बंदर विश्वस्तमंडळाचे

कर्मचारी

(वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार)

विनियम, १९७६

टी आर क्रमांक १४१ दिनांक २७ एप्रिल, १९७६

मुंबई बंदर विश्वस्तमंडळाचे कर्मचारी (वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार) विनियम, १९७६

१. संक्षिप्त शीर्षक, प्रयुक्ती व प्रारंभ

(१). या विनियमांस मुंबई बंदर विश्वस्तमंडळ कर्मचारी (वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार) विनियम, १९७६ असे म्हणावे.

(२) हे विनियम मुंबई शहर आणि त्याच्या लगतच्या क्षेत्रामधील जे कर्मचारी कामावर किंचा रजेवर किंवा निलंबित आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू आहेत.

(३) ते, शासनाने मंजूर केलेल्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास व तेंव्हापासून अमलात येतील.

२. व्याख्या

या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(१). "मंडळ", "अध्यक्ष" आणि "उपाध्यक्ष" यांना मुख्य बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९६३ मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

(२). मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अर्थ, अनुक्रमे मंडळाचा मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी असा आहे.

(२अ). "लगतचे क्षेत्र" याचा अर्थ मुंबई शहराशी संलग्न पश्चिम रेल्वेच्या वसई क्षेत्र आणि मध्य रेल्वेवरील कसारा आणि कर्जत पर्यंतची क्षेत्रे असा आहे.

(३). "दवाखाना" याचा अर्थ, या विनियमाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेला दवाखाना, असा आहे.

स्पष्टीकरण -

(एक) परिशिष्ट 'क' मध्ये देण्यात आलेल्या दवाखान्यांच्या यादीमध्ये वेळोवेळी, मंडळाच्या मंजुरीने फेरफार होऊ शकतो किंवा त्यात भरही पडू शकते.

(दोन) वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार पुरविण्यासाठी आठवडयाच्या ज्या तारखेला व ज्या वेळांमध्ये दवाखाना उघडण्यात येईल ते दिवस व ती वेळ वेळोवेळी, मुख्य वैद्यकीय अधिकारी निश्चित करील. तथापि, अशाप्रकारे निश्चित केलेल्या कालावधी व्यतिरिक्त आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीची व्यवस्था हाताळण्याचा निर्णय मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे घेण्यात येईल.

(४). "बंदर विश्वस्तमंडळ रुग्णालय" याचा अर्थ, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबाच्या उपचारासाठी मुंबईतील वडाळा येथे मुंबई बंदर विश्वस्त मंडळाद्वारे रुग्णालयाची स्थापना केलेले व परिरक्षित करण्यात येत असलेले रुग्णालय, असा आहे.

<u>स्पष्टीकरण -</u>

ज्या कालावधीत बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयातील विविध विभाग आणि सेवा, वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचारासाठी खुले ठेवण्यात येईल तो कालावधी, वेळोवेळी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे निश्चित करण्यात येईल.

(५). "कर्मचारी" याचा अर्थ, मंडळाचा कर्मचारी, मग तो स्थायी असो किंवा अस्थायी आणि त्यामध्ये स्वीयोतर सेवा करणारा कोणताही कर्मचारी किंवा केंद्र किंवा राज्य शासनाचा किंवा अस्थायी किंवा स्थानिक किंवा अन्य प्रधिकरणाचा प्रतिनियुक्तीवरील कोणताही स्थायी किंवा अस्थायी कर्मचारी, असा आहे.

(६) **कर्मचाऱ्याच्या संदर्भात कुटुंब याचा अर्थ, -**

(एक) जर कर्मचारी पुरुष असेल तर, त्याची पत्नी;
(दोन) जर कर्मचारी स्त्री असेल तर तिच्यासोबत राहणारा व तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेला तिचा पती, आणि
(तीन) कर्मचाऱ्यासोबत राहणारी व त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेली मुले किंवा सावत्र मुले;
(चार) कर्मचाऱ्यासोबत त्यावेळी राहणारे आणि त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले पालक;

<u>स्पष्टीकरण</u>

(१) कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या पालकांच्या बाबतीत जर ते कर्मचाऱ्याबरोबर त्यावेळी राहत असतील आणि घरे, धारण जमिनी इत्यादी या सर्व स्त्रोतांसह त्यांचे महिन्याचे एकूण आवर्ती उत्पन्न रुपये २५० पेक्षा अधिक नसेल. ठोक अनावर्ती उत्पन्न उदाहरणार्थ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी लाभ, उपदान/अंशराशीकृत उपदान, विमा लाभ इत्यादी या बाबी या खंडाच्या प्रयोजनार्थ 'उत्पन्न' म्हणून संबोधले जाणार नाही. पालकांच्या उत्पन्नाच्या संबंधातील प्रतिज्ञापत्र संबंधित कर्मचाऱ्याद्वारे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला सादर करण्यात येईल. जर एखाद्या कर्मचाऱ्याने वर्षाच्या सुरुवातीलाच त्याच्या पालकांच्या त्याच्यावरील अवलंबित्वाबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले नाही, तर पालकांसाठी वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार मिळण्याच्या वेळीचे प्रतिज्ञापत्र स्वीकारण्यात येईल. परंतु ज्या तारखेपासून पालक त्यांच्यासोबत राहत आहेत तो दिनांक त्यात दर्शविण्यात यावा आणि अशाप्रकारे

केलेल्या विवरणपत्राच्या खरेपणाबद्दल मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे. जरी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच उत्पन्नाच्या संदर्भातील प्रतिज्ञापत्र केलेले असले तरी जर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याला वाटले की कर्मचाऱ्याने पालकांसाठी वैद्यकीय शुश्रूषा व उपचार मिळविताना आणखी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे, तर तो तसे करु शकतो.

(२) विवाहित, विधवा आणि घटस्फोटित मुली कर्मचाऱ्यावर "पूर्णपणे अवलंबून" आहेत असे कोणत्याही परिस्थितीत समजले जाणार नाही.

(३) कोणतीही मुले किंवा अविवाहित मुली नैमितिक पध्दती व्यतिरिक्त अन्यथा कार्यरत आहेत त्यांना प्राप्तिकारी कर्मचारी म्हणून मानण्यात येईल आणि ते संबंधित कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असल्याचे मानता येणार नाही. मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यास, मुलगे आणि अविवाहित मुलींच्या वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचाराची सुविधा घेताना कर्मचाऱ्यास मुलगे आणि अविवाहित मुलींची व्यावसायिक स्थिती आणि निवासस्थान या संबंधातील प्रतिज्ञापत्र मागवणे आवश्यक करता येईल.

(४) "बालके" या संज्ञेत कायदेशीर दत्तक घेतलेली बालके अंतर्भूत आहेत.

(५) अवलंबित मुलगा आणि मुलगी जी मुंबईच्या आणि तिच्या लगतच्या क्षेत्राबाहेर शिक्षण घेत असतील तर ती मुंबई आणि लगतच्या क्षेत्रात राहणाऱ्या कर्मचाऱ्यासोबत राहत असल्याचे मानण्यात येईल आणि मुलगा आणि मुलगी वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार घेण्याच्या वेळी मुंबई किंवा तिच्या लगतच्या क्षेत्रात आले असतील तर ते मुंबई किंवा तिच्या लगतच्या क्षेत्रात राहणारे आहेत असे समजण्यात येईल.

(६) कर्मचाऱ्याची पत्नी, जर ती स्वत: केंद्र किंवा राज्य शासनाच्या विभागात किंवा महामंडळ/उपक्रम, केंद्र किंवा राज्य सरकारद्वारे संपूर्ण किंवा अंशत: वित्तसहाय्यित किंवा स्थानिक संस्था किंवा खाजगी संघटनांमध्ये कार्यरत असेल, जेथे कर्मचाऱ्याला आणि कर्मचाऱ्याच्या पात्र मुलांना वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात, अशा वेळी कर्मचारी या विनियमान्वये मिळणारी सुविधा किंवा त्याच्या पत्नीच्या संस्थेकडून मिळणारी वैद्यकीय सुविधा यापैकी कशाचीही निवड करण्यास हक्कदार असेल. जर समजा तिला आणि/किंवा तिच्या पात्र मुलांना या विनियमांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या सुविधा स्वत:साठी/त्यांच्यासाठी प्राप्त करुन घेतल्या असतील, तर कर्मचाऱ्याने त्याच वैद्यकीय खर्चाची कोणत्याही अन्य मार्गाने प्रतिपूर्ती करण्यासाठी दावा केला नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे. जर पती-पत्नी दोघेही बंदर मंडळाचे कर्मचारी असतील, तर अशा प्रकरणी पत्नी तसेच पात्र अवलंबित व्यक्तीला त्याच्या/तिच्या दर्जानुसार, या विनियमांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या वैद्यकीय सवलतींचा लाभ प्राप्त करुन घेण्याची मुभा देता येईल.

(७). "वैद्यकीय शुश्रूषा" याचा अर्थ -

(एक) दवाखान्यात प्रभार असलेल्या किंवा त्या दवाखान्यास संलग्न असलेल्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे, करण्यात आलेली शुश्रूषा किंवा;

(दोन) जर, आजारपणाच्या गंभीरतेमुळे रुग्ण स्वत: दवाखान्यात येऊ शकत नसेल तर रुग्णाच्या निवासस्थानी प्रभार असलेल्या किंवा संलग्न असलेल्या, त्याच्या निवासस्थानाजवळच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे रुग्णाच्या निवासस्थानी केलेली किंवा कर्मचाऱ्याचे वेतन ६५० रुपयांपेक्षा अधिक असेल तर, प्रभार असलेल्या किंवा संलग्न असलेल्या निवासस्थानापासून जवळ असलेल्या दवाखान्यातील किंवा सहायक वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेली त्याची शुश्रूषा किंवा;

(तीन) सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी जर त्याला पूर्वमंजुरी दिली असेल तर, प्रशासकीय इमारतीमधील कार्यालयातील समंत्रक कक्षामध्ये केलेली शुश्रूषा; किंवा

(चार) बंदर मंडळ रुग्णालयामध्ये (बाह्यरुग्ण विभाग) रुग्णालयाने केलेल्या पूर्वव्यवस्थेनुसार केलेली शुश्रूषा आणि त्यात पुढ़ील गोष्टी अंर्तभूत आहेत:-

(क) कोणत्याही दवाखान्यामध्ये उपलब्ध असणऱ्या रोगनिदानाच्या प्रयोजनासाठी विकृतीजन्य, जीवाणुजन्य, किरणोत्सर्गी अशा रोगनिदानाच्या पध्दती किंवा रोगनिदानाच्या इतर पध्दती ज्याची आवश्यकता असल्याचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी, सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले आहे, आणि

(ख) वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिति सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयातील तज्ज्ञांशी अशाप्रकारे विचारविनियम केल्यानंतर त्यास आवश्यक वाटेल अशा मर्यदित व अशा रितीने बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयातील तज्ज्ञ म्हणून वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिति सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याशी विचारविनियम करुन निर्धारित करील किंवा बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयातील आवश्यक अशा तज्ञांच्या अनुपस्थितीमध्ये, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने आवश्यक असल्याचे प्रमाणित केल्यावर आणि खाजगी तज्ज्ञांनी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर त्यास आवश्यक वाटेल अशा मर्यदिपर्यंत व अशा रीतीने खाजगी तज्ज्ञांनी केलेली शुश्रूषा, होते.

(८) "रुग्ण" याचा अर्थ, कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य ज्याला हे विनियम लागू आहेत आहेत आणि जो आजारी आहे.

(९) "उपचार" याचा अर्थ दवाखान्यात किंवा प्रशासकीय कार्यालय इमारतीमध्ये परिरक्षित केलेल्या समंत्रण कक्षामध्ये किंवा यथास्थिति रुग्णालयात ज्यामध्ये रुग्णाचा उपचार केला जातो अशा वैद्यकीय आणि शस्त्रविद्येसंबंधी उपलब्ध सर्व सुविधांचा वापर आणि त्यात (क) पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो :

(एक) कोणत्याही दवाखान्याला संलग्न वैद्यकीय अधिकाऱ्याला, बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयाला संलग्न सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा डॉक्टर यांना यथास्थिती आवश्यक वाटणाऱ्या अशा विकृतिजन्य, जीवाणुजन्य, किरणोत्सर्गी किंवा कोणत्याही इतर पध्दतीचे सेवायोजन

(दोन) अशी औषधे लस, सेरा किंचा इतर रोगनिवारक द्रव्ये जी दवाखान्यात किंवा बंदर विश्वस्त मंडळ रुणालयामध्ये सर्वसाधारणपणे उपलब्ध असतात परंतु पुढील गोष्टी वगळून,-

(क) असे पदार्थ जे औषध नाहीत परंतु अन्न, शक्तिवर्धक, स्वच्छतागृह स्वच्छक किंवा जंतुनाशक म्हणून वापरता येतात आणि

(ख) अशी खर्चिक औषधिद्रव्ये, ज्ञाक्तिवर्धके, सारके आणि इतर शोभिवंत आणि एकस्वाधिकार औषधे (ज्यासाठी समान उपचार मूल्य औषधिद्रव्ये उपलब्ध आहेत) जे, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे वेळोवळी घालून दिल्याप्रमाणे असतील.

(तीन) जर अशी औषधे, लस, सेरा किंवा इतर उपचारशास्त्रीय पदार्थांचा पुरवठा सर्वसाधारणपणे उपलब्ध नसेल तर, दवाखान्यास संलग्न वैद्यकीय अधिकारी, सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिति रुग्णालयाला संलग्न असलेले डॉक्टर यांना प्रकृती सुधारणेसाठी, किंवा रुग्णाच्या प्रकृतीमध्ये आणखी गंभीरता निर्माण होऊ नये म्हणून लेखी प्रमाणपत्र देता येईल.

(चार) रुग्णामधील गंभीर शारीरिक दोष किंवा कमतरतेवर कृत्रिम मात करण्यासाठी सहाय्यकारी कृत्रिम अवयव घेण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यास आवश्यक असे लेखी प्रमाणपत्र देता येईल.

(पाच) रुग्णालयात सामान्यत: अशी व्यवस्था केली जाते आणि ती त्याच्या दर्जानुरुप असते. जर त्याच्या दर्जानुरुप व्यवस्था उपलब्ध नसेल तर उच्च श्रेणीची व्यवस्था पुरविण्यात येईल; मात्र रुग्ण बंदर विश्वस्तमंडळ रुग्णालयात उपचार घेत असेल तर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे किंवा जर रुग्ण इतर कोणत्याही रुग्णालयात उपचार घेत असेल तर, संबंधित रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकाद्वारे तसे प्रमाणित करण्यात येईल.

(१) जेथे रुग्णाला रुग्णालयात दाखल करताना उचित श्रेणीची व्यवस्था उपलब्ध झाली नसेल; आणि

(२) जेथे उचित श्रेणीची व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत रुग्णाच्या प्रकृतीला धोका निर्माण होणार नाही, याबाबत काळजी रुग्णालय घेईल.

(सहा) अशी शुश्रूषा जी बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयाद्वारे रुग्णाला सर्वसाधारणपणे पुरविण्यात येते किंवा इतर कोणत्याही रुग्णालयामध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णाला सर्वसाधारणपणे पुरविण्यात येणारी अशी शुश्रूषा.

(सात) मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने रुग्णाला बरे होण्यासाठी आवश्यक असल्याचे किंचा रुग्णाची स्थिती गंभीर होऊ नये म्हणून आजाराची परिस्थिती पाहून, लेखी प्रमाणित केलेली अशी विशेष शुश्रूषा.

(आठ) दरमहा २२० रु. पेक्षा अधिक मासिक वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यास अधीन राहून रुग्णालयात सर्वसाधारणपणे पुरविण्यात येणारा असा आहार, आहार-शुल्काची वसुली मंडळाद्वारे, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशा दराने करण्यात येईल.

(नऊ) खंड (७) च्या उपखंड (ख) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे विशेषज्ज्ञाशी विचारविनियम;

(दहा) बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयामध्ये महिला रुग्णाची प्रसूती,

(अकरा) महिला रुगणांना, मुलांच्या संबंधात किंवा प्रसूतीच्या वेळी शरीरक्रियाशास्त्रीय किंवा इतर व्यंग याच्या संबंधात प्रसूतीपूर्व किंवा प्रसूतीनंतर प्रसवपूर्व आणि प्रसवोत्तर देण्यात आलेले उपचार.

(बारा) दंत चिकित्सेबाबत, जेव्हा दवाखान्याशी संलग्न वैद्यकीय अधिकाऱ्याच्या, सहाय्यक मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या, वरिष्ठ दंत चिकित्सकाच्या किंवा यथास्थिति मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्यावरुन जेव्हा त्याबाबतीत मंडळाच्या वतीने केलेल्या विनियमाअन्वये शासकीय दंत महाविद्यालय, मुंबई येथून दंत उपचार घेतले जातात.

(तेरा) रेबीक प्रतीबंधक उपचार

(चौदा) रक्तसंक्रमण सेवा; आणि

(पंधरा) रुग्णाला रुग्णालयापर्यंत पोहचवण्यासाठी जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा रुग्णवाहिका सेवेची तरतूद

(ब) परंतु त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नसेल:

(एक) उपचाराचा भाग म्हणून रुग्णाने खरेदी केलेल्या डोळ्यांच्या चष्म्याचे शुल्क जर कोणतेही असल्यास,

(दोन) खंड (क) च्या उपखंड (पंधरा) मधील तरतुदी व्यतिरिक्त रुग्णाच्या निवासस्थानापासून रुग्णालयापर्यंत किंवा रुग्णालयापासून निवासस्थानापर्यंत जाण्यासाठी अंतर्भूत असलेला आणि टॅक्सी, घोडागाडी (हॅक व्हिक्टोरिया) किंवा इतर वाहन आकार.

(तीन) रुग्णालयात अंतर्गत रुग्णासाठी सर्वसाधारणपणे पुरविण्यात येत नाहीत असे आहारातील विशेष पदार्थ.

३. **<u>कर्मचाऱ्यांची वैद्यकीय शुश्रूषा व त्यांच्यावरील उपचार</u>**

(१) कर्मचारी, दवाखान्याचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी किंवा त्या दवाखान्याशी संलग्न असलेल्या अधिकाऱ्याकडून आणि वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे शिफारस करण्यात आली असेल तर, प्रशासकीय कार्यलय इमारतीमधील समंत्रण कक्षामध्ये सहायक वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती, मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून मोफत वैद्यकीय शुश्रूषा व उपचार करुन घेण्यास हक्कदार असेल.

परंतु असे की, जर कर्मचाऱ्याची वेतनश्रेणी रुपये ६५० पेक्षा जास्त असेल तर अशी इच्छा असल्यास, तो प्रशासकीय कार्यालय इमारतीमधील सहायक वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या समंत्रण कक्षामध्ये थेट वैद्यकीय शुश्रूषेची मागणी करू शकतो.

(२) जेथे कर्मचारी उप-विनियम (१) अन्वये मोफत वैद्यकीय शुश्रूषा घेण्यासाठी हक्कदार असेल आणि अशा वैद्यकीय शुश्रुषेसाठी त्याच्याकडून प्रदान करण्यात आलेली कोणतीही रक्कम, सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले परिशिष्ट 'ब' मध्ये विहित केलेल्या नमुन्यातील या बाबतीतील प्रमाणपत्र सादर केल्यावर त्याला परत करण्यात येईल.

४. **कर्मचाऱ्याच्या कुटुंबांची वैद्यकीय शुश्रूषा व त्यांच्यावरील उपचार-**

कर्मचाऱ्याचे कौटुंबिक सदस्य, वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचारासाठी बंदर विश्वस्त मंडळाच्या खर्चाने दवाखाना किंवा प्रशासकीय कार्यालय इमारतीच्या समंत्रण कक्षामध्ये या विनियमाअन्वये कर्मचाऱ्याला स्वत:ला त्याची श्रेणी आणि शर्ती यानुसार, हक्कदार असेल.

५. **दवाखान्याचा प्रभारी असलेला किंवा दवाखान्याशी संलग्न असलेला प्रभारी वैद्यकीय किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याखेरीज अन्य व्यक्तीद्वारे वैद्यकीय शुश्रूषा -**

(१) जर, दवाखान्याचा प्रभारी असलेल्या किंवा दवाखान्याशी संलग्न असलेल्या सहायक मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे असे मत झाले की, रुग्णाची गंभीर किंवा विशेष स्वरुपाची परिस्थिती पाहता त्याच्या व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने वैद्यकीय शुश्रूषा करणे आवश्यक आहे,-

(क) तर तो रुग्णाला विनियम २ च्या उपविनियम (७) च्या खंड (ख) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयाच्या पूर्णवेळ किंवा यथास्थिती अर्धवेळ असणाऱ्या विशेषज्ज्ञाकडे ज्याची वैद्यकीय शुश्रूषा त्याच्या मते रुग्णासाठी आवश्यक आहे, किंवा

(ख) जर बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयामध्ये असा कोणताही तज्ज्ञ डॉक्टर नसेल आणि त्याच्या मते वैद्यकीय शुश्रूषा रुग्णासाठी आवश्यक असेल तर, तो विनियम २ च्या उपविनियम (७) च्या खंड (ख) मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीअन्वये रुग्णाला मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवेल, जो प्रकरणाची तपासणी करुन रुग्णाला खाजगी तज्ज्ञ डॉक्टराकडे पाठवू शकेल.

(ग) (क) किंवा (ख) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांमध्ये जर रुग्ण जास्त आजारी असल्यामुळे करू शकत नसेल तर बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयामधील योग्य तज्ज्ञ डॉक्टरची किंवा खाजगी तज्ञ डॉक्टरची किंवा यथास्थिती मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याची शिफारस केलेली असेल त्याने रुग्णाच्या निवासस्थानी जाऊन रुग्णावर उपचार करण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) जेथे, उप विनियम (१) च्या खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये, खाजगी तज्ज्ञ डॉक्टरकडून रुग्णास वैद्यकीय शुश्रूषा प्राप्त होत असेल तर, अशा तज्ज्ञ डॉक्टरची फी परिशिष्ट 'ग' मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र सादर केल्यावर, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडून संपूर्ण प्रतिपूर्ती मिळेल.

(३) (क) जेथे उपविनियम (१) अन्वये कर्मचारी, बंदर विश्वस्तमंडळ रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचार विनाशुल्क घेण्यासाठी हक्कदार असेल, तेथे अशा वैद्यकीय शुश्रुषेसाठी त्याने कोणती रक्कम प्रदान केली असेल तर, परिशिष्ठ 'ब' मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र सादर केल्यावर मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून संपूर्ण प्रतिपूर्ती मिळेल.

(ख) जेथे कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्य उप-विनियम (१) अन्वये बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचारासाठी हक्कदार असेल तर तेथे अशा वैद्यकीय शुश्रूषेसाठी कर्मचाऱ्याने प्रदान केलेल्या रकमेची परिशिष्ट 'ब' मध्ये, विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र सादर केल्यावर संपूर्ण प्रतिपूर्ती मिळेल.

६. <u>रुग्णालयातील वैद्यकीय उपचार -</u>

(१) कर्मचारी विनाशुल्क वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचारासाठी हक्कदार असेल :-

(क) बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयात; किंवा

(ख) जर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे असे मत झाले की, बंदर विश्वस्तमंडळ रुग्णालय मुंबईतील किंवा तिच्या आजूबाजूच्या परिसरातील जेथे कर्मचारी आजारी पडला आहे अशा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक आणि यथोचित सुविधा पुरवू शकत नाही तर - मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मते आवश्यक आणि यथोचित सुविधा पुरवल्या जाऊ शकतात; किंवा

(ग) जेथे एखाद्या अपवादात्मक प्रकरणामध्ये, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे असे मत झाले की आवश्यक आणि यथोचित उपचार मुंबईतील केवळ खाजगी रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात (नर्सिंग होममध्ये) होत असतील अशा खाजगी रुग्णालयात आणि शूश्रूषालयामध्ये,

<u>टीप</u>:

(१) मुंबईतील शासकीय आणि महानगरपालिका रुग्णालयातील सुविधांमध्ये त्या रुग्णालयाशी संलग्न असलेल्या शुश्रूषालयामध्ये प्रवेश मिळणे अंतर्भूत नसेल. जर वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मते, मुंबईतील शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयाला संलग्न असलेल्या शुश्रूषालयात रुग्णाला दाखल करुन घेणे रुग्णासाठी आवश्यक असेल तर तो रुग्णाला अशा शुश्रूषालयात पाठवेल, मात्र अशा प्रकरणामध्ये उपचाराचा खर्च मंडळ आणि कर्मचारी यांच्यात एकास दोनच्या गुणोत्तरात करण्यात येईल.

(२) शासकीय, महानगरपालिका किंवा खाजगी रुग्णालयामध्ये जेथे वेगवेगळ्या स्तरावरील निवासी व्यवस्था पुरविण्यात येते तेथे मंजुरीनुसार उपचार घेत असणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, स्तरामध्ये कर्मचाऱ्याने कोणत्या निवासी स्तरावर प्रवेश घेतला पाहिजे याबाबतचे निर्देश मुख्य वैद्यकीय अधिकारी देईल.

(२) जेथे कर्मचारी उप विनियम (१) अन्वये बंदर विश्वस्तमंडळ रुग्णालय किंवा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालय किंवा खाजगी रुग्णालय किंवा शुश्रूषालय यामध्ये वैद्यकीय शुश्रूषेस आणि उपचारास हक्कदार असेल आणि अशा उपचारावर त्याने कोणती रक्कम प्रदान केली असेल तर ती परिशिष्ट 'ड' मध्ये विहित केलेल्या नमुन्यात मागणी केल्यावर तो हक्कदार असेल आणि त्याच्या प्रवेशास परवानगी देणाऱ्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र सादर केल्यावर त्याला प्रतिपूर्ती मिळेल.

परंतु असे की, ज्या कर्मचाऱ्याचे मासिक वेतन रु. २२० हून अधिक आहे आणि ज्याच्यावर उपचार सुरु आहेत त्याच्याकडून विनियम २ च्या उपविनियम (९) च्या खंड (आठ) अन्वये मंडळ वेळावेळी निश्चित करील अशा दराने पोषक आहार शुल्क वसूल करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, उप विनियम (१) च्या उपखंड (ख) अन्वये खाजगी रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात उपचार घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या प्रतिपूर्तीसाठी बंदर विश्वस्त मंडळ उत्तरदायी असेल आणि त्यात विशेष शुश्रूषालय, शक्तीवर्धके, पुनर्स्थापके यांचा समावेश नसेल आणि जो कर्मचारी मोफत पोषक आहारास पात्र असेल व बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयात उपचार घेत असेल, त्याच्या पोषक आहाराचाही समावेश असणार नाही.

परंतु आणखी असे की, एखाद्या खाजगी रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात उपचार घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत ज्याने सल्ला दिला होता त्या तज्ज्ञाच्या फी सह, कोणती असल्यास, उपचाराचा खर्च आणि कर्मचाऱ्यावर कोणती शस्त्रक्रिया झाली असेल तर शल्यविशारद व भूलतज्ज्ञ ज्यांनी शस्त्रक्रिया केली त्यांची फी त्याचबरोबर आकस्मिक खर्च आणि शस्त्रक्रियागृहासाठी आकारण्यात आलेला आकार बंदर विश्वस्त मंडळ देईल आणि कर्मचाऱ्याने मुंबईमधील शासकीय किंवा महानगरपालिकेशी संलग्न शुश्रूषालयात उपचार घेतल्यास हे शुल्क मंडळ आणि कर्मचारी यांच्यात दोनास एक प्रमाणात देय असेल.

<u>टीप</u>:

(१) खाजगी रुग्णालय किंवा शुश्रूषालय किंवा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालय यांच्याशी संलग्न असलेले शुश्रूषालय यामधील प्रत्येक स्तरावर झालेल्या शस्त्रक्रियांच्या संबंधातील प्रतिपूर्तीसाठी महत्तम आकार परिशिष्ट 'ड' मध्ये घालून दिल्याप्रमाणे देण्यात येतील. अध्यक्ष, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या शिफारशीवरुन प्रतिपूर्तीसाठी गणना करावयाचा महत्तम आकार वेळोवेळी सुधारेल, मात्र अशा आकारातील कोणती घट, मंडळाच्या मंजुरीशिवाय करता येणार नाही.

(२) खाजगी रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात किंवा शासकीय संलग्न शुश्रूषालयात किंवा महानगरपालिका दवाखान्यात स्वत:साठी रुग्णालयात दाखल झालेल्या कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणात प्रत्येक आहारशुल्काचा सरसकट अंतर्भाव करुन प्रशुल्क पुढील प्रमाणे आकारण्यात येईल:

(क) ज्या ठिकाणी रुग्णालयाच्या सरसकट आकारात (एक) आहार (दोन) निवासव्यवस्था (तीन) सर्वसामान्य शुश्रूषा आणि (चार) वैद्यकीय व शस्त्रक्रिया सेवा, या गोष्टी अंतर्भूत असतील, त्या ठिकाणी अशा सरसकट आकाराच्या २० टक्के आकार आहारशुल्क म्हणून आकारण्यात येईल.

(ख) ज्या ठिकाणी रुग्णालयाच्या सरसकट आकारात (एक) आहार (दोन) निवासव्यवस्था (तीन) फक्त सर्वसाधारण शुश्रूषा परंतु (चार) जसे वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया सेवा नाही, यांचा अंतर्भाव असेल, त्या ठिकाणी सरसकट शुल्काच्या ५० टक्के आकार आहारशुल्क म्हणून आकारण्यात येईल.

(३) कर्मचाऱ्याचे कौटुंबिक सदस्य बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयात किंवा त्याच्या जवळपासच्या मुंबईतील शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयात किंवा मुंबईतील त्याच्या जवळपासच्या क्षेत्रातील खाजगी रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात, या विनियमान्वये कर्मचाऱ्यास स्वत:साठी जी श्रेणी आणि ज्या अटींवर मुभा देण्यात आली आहे त्या श्रेणी व अटींवर वैद्यकीय शुश्रूषा व उपचार घेण्यासाठी हक्कदार असतील.

७. <u>निवासस्थानी करावयाचे उपचार -</u>

(१) जर आजारी कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील आजारी सदस्य यांनी त्याच्या निवासस्थानापासून जवळच्या दवाखान्यास संलग्न प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास विनंती केल्यास किंवा जर कर्मचारी रुपये ६५० पेक्षा अधिक वेतन श्रेणी मध्ये येत असेल तर सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी,रुग्णाच्या घरी जाऊन त्याची तपासणी करेल आणि हा वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांची अशी खात्री पटली की आजारपण किंवा इतर कारणांमुळे कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य औषधोपचार घेण्यासाठी व्यक्तिश: दवाखान्यात येण्यास असमर्थ आहे तर, विनियम ३ मध्ये तस्तूद केल्यानुसार कर्मचारी व त्याच्या कुटुंबातील सदस्य यांना वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिती, समान वेतनश्रेणीवर सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी, त्याच्या निवासस्थानी जाऊन स्वत: उपचार करू शकतात आणि शर्तीनुसार दवाखान्यात मिळणाऱ्या उपचारांच्या सुविधा निवासस्थानी मिळाव्यात यासाठी तो हक्कदार असेल.

परंतु तसेच जोगेश्वरी किंवा भांडूपच्या पालिकडे राहणारा कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या बाबतीत त्याच्या निवासस्थानी एक वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिति सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना बोलावण्याचा अधिकार उपलब्ध असणार नाही.

८. भांडूप किंवा जोगेश्वरीच्या पलिकडे राहणारे कर्मचारी: -

(१) भांडूप किंवा जोगेश्वरीच्या पलिकडे राहणाऱ्या कर्मचाऱ्यास किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यास, रुग्ण अत्यंत आजारपणामुळे आवश्यक वैद्यकीय शुश्रूषा अणि उपचार घेण्यासाठी दवाखान्यात व्यक्तिश: येण्यास असमर्थ असेल तर मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या पूर्व मंजुरीने स्थानिक वैद्यकीय तज्ज्ञाकडून कर्मचाऱ्याच्या निवासस्थानी उपचार करून घेता येतील.

(२) जेथे उप विनियम (१) अन्वये कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबाचा सदस्य त्याच्या निवासस्थानी उपचार घेत असेल तर तो अशा उपचारावर खर्च होणाऱ्या संपूर्ण रकमेइतका त्याने उपचारावर केलेला संपूर्ण खर्च मिळण्यास तो हक्कदार असेल. परंतु असे की सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना उपचाराचा खर्च योग्य वाटला पाहिजे.

९. तातडीचे उपचार -

कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याला अचानक गंभीर आजार उद्‌भवल्यास किंवा गंभीर अपघातात गंभीर दुखापत झाली असेल अणि अशा स्थितीत त्याच्या जिवाची जोखीम पत्करून त्याला बंदर मंडळ रुग्णालयामध्ये दाखल करण्याजोगी स्थिती नसेल अणि तो ज्या ठिकाणी आजारी झाला असेल त्या ठिकाणापासून जवळच्या शासकीय महानगरपालिका किंवा खाजगी रुग्णालयात विनियम ६ च्या उपविनियम (१) च्या खंड (ख) किंवा (ग) अन्वये मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पूर्व मंजूरीने त्याला दाखल केले तर अन्यथा बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयात दाखल करण्यासाठी त्याची प्रकृती स्थिर असेल तिथपर्यंत उपचाराचा वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल. जर रूग्णाला दाखल करतेवेळेची स्थिती आणि शुश्रूषेची परिस्थिती, शासकीय महानगरपालिका किंवा खाजगी रुग्णालयामध्ये दाखल केल्यावर तात्काळ मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिल्यास अणि त्या परिस्थितीची काळजीपूर्वक तपासणी केल्यानंतर, मुख्य वैद्यकीय अधिकारी अशा प्रतिपूर्तीसाठी शिफारस करील.

१०. <u>काही विशिष्ट रोगांसाठी विशेष तरतूद, जसे की क्षयरोग, कर्करोग, पोलियो आणि मानसिक रोग.</u>

(१) क्षयरोग -

(एक) कर्मचारी आणि त्यांची कुटुंबे प्रिन्सेस डॉक टी.बी. केंद्र आणि इतर दवाखान्यांमध्ये क्षयरोगासाठी उपलब्ध असलेल्या उपचारांची सुविधा विनाशुल्क घेण्यास हक्कदार असतील.

(दोन) ज्या ठिकाणी मंडळाने खाटा राखीव ठेवलेल्या आहेत अशा मुंबईबाहेरील कोणत्याही आरोग्यधामामध्ये (हवापालट करणारे ठिकाण) मोफत उपचार घेण्याचा हक्क कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबियास आहे. मात्र एका वेळी दाखल झालेल्या रुग्णांची संख्या ही राखीव खाटांच्या संख्येपेक्षा जास्त झाल्यास किंवा कर्मचाऱ्याची वेतनश्रेणी रुपये ६५० पेक्षा जास्त असल्यास अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांकडून आहारशुल्क आकारण्यात येईल, या अटीला अधीन राहून खाटांचे आरक्षण असेल.

परंतु असे की, क्षयरोग आरोग्यधामातील उपचार अतिशय आवश्यक असल्याबाबत मुख्य वैद्यकीय अधिकारी प्रमाणित करील.

(तीन) कर्मचारी आणि त्याचे कुटुंबिय यांना या विनियमाअन्वये अनुज्ञेय प्रतिपूर्ती देखील अनुज्ञेय असू शकते. जेंव्हा मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्यावरुन ते त्यांच्या स्वत:च्या प्रयत्नाने केंद्र सरकारी कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या क्षयरोगाच्या उपचारासाठी मुंबईतील क्षयरोग संस्थेमध्ये किंवा मान्यताप्राप्त मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे पदनिर्देशित मुंबईतील क्षयरोग संस्थेमध्ये दाखल करुन घेतील, मात्र रुग्णाला आरोग्यधामामध्ये तात्काळ हलविणे किंवा रुग्णालयातील उपचार हे त्याच्यासाठी अतिशय आवश्यक आहेत आणि बंदर विश्वस्त मंडळ ज्या आरोग्यधामामध्ये त्यांच्या कर्मचाऱ्यासाठी खाटा राखीव ठेवते तेथे खाटा उपलब्ध नाहीत असे मुख्य वैद्यकीय अधिकऱ्याने असे विनिर्दिष्ट केले असेल त्यास अधीन राहून दाखल करता येईल.

(३) कर्करोग (हॉजकीनचा रोग आणि रक्ताचा कर्करोग (ल्यूकेमिया) सह)

(एक) खंड (दोन) आणि (तीन) च्या तरतुदींना अधीन राहून कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य हे तपासणी करुन घेण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने मुंबईतील टाटा मेमोरीअल रुग्णालयात कर्करोगासाठी उपचार घेण्यास पात्र असतील.

(दोन)(क) जेथे खंड (१) अन्वये टाटा मेमोरीअल रुग्णालयामध्ये उपचार घेतलेल्या कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी त्या रुग्णालयाच्या कोणत्याही तज्ज्ञ डॉक्टर किंवा भिषक यांच्या बरोबरील विचारविनियमासाठी कोणते शुल्क प्रदान केले असेल तर परिशिष्ट 'ग' मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र सादर केल्यावर त्याला संपूर्ण प्रतिपूर्ती देण्यात येईल.

(ख) जेथे, टाटा मेमोरियल रुग्णालयात कर्मचाऱ्यावर उपचार केलेल्या शल्यचिकित्सक किंवा भिषकाच्या मते त्याला रुग्णालयात दाखल करणे अत्यंत आवश्यक असेल आणि कर्मचारी किंवा यथास्थिति त्याच्या कुटुंबातील सदस्य त्या रुग्णालयात उपचार घेत असेल तर कर्मचाऱ्याने किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने स्वत:च्या उपचारासाठी किंवा यथास्थिति कर्मचाऱ्याच्या उपचारासाठी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा निवासव्यवस्थेसाठी प्रदान केलेली रक्कम परिशिष्ट 'घ' मध्ये विहित केल्याप्रमाणे आणि त्याच्या अनुज्ञेयतेबाबत मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने एक प्रमाणपत्र सादर केल्यावर त्याला पूर्णपणे प्रतिपूर्ती मिळण्यासाठी दावा करता येईल.

परंतु असे की, रुग्ण रुपये ६५० पेक्षा अधिक वेतनश्रेणीत असल्याखेरीज किंवा अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्य असल्याखेरीज बंदर रुग्णालयाकडून पोषण आहाराचे शुल्क आकारले जाणार नाही.

(३) मनोविकार /मानसिक विकार

कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील एखादा सदस्य जर मनोरुग्ण असेल आणि मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्यानुसार एन. एम. मनोरुग्णालय, ठाणे येथे सल्ला किंवा उपचार घेत असेल तर, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल असा उपचार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी ग्राह्य धरला जाईल आणि जोपर्यंत रुग्णालयाचा वैद्यकीय अधीक्षक प्रारंभिक सहा महिन्याच्या कालावधीनंतर रुग्ण पूर्ण बरा होण्यासाठी आणखी एक वर्षापर्यंतचा वाजवी कालावधी प्रमाणित करीत नाही तोपर्यंत वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणार नाही.

आणखी असे की, विनियम २ मधील उप विनियम ९, खंड (आठ) च्या तरतुदीमध्ये काहीही असले तरी, जर कर्मचाऱ्याचे मासिक वेतन ६५० रूपयापेक्षा जास्त नसेल आणि एन. एम. मनोरुग्णालय येथे उपचार घेत असेल तर आहारशुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती मिळू शकेल. कर्मचाऱ्याचे मासिक वेतन रुपये ६५० पेक्षा जास्त असेल तर रुग्णालय शुल्काच्या २० टक्के शुल्क हे आहारशुल्क म्हणून गणले जाईल आणि त्याची प्रतिपूर्ती मिळणार नाही.

(४) पोलीओ

जर एखादा कर्मचारी किंवा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्य पोलीओच्या आजाराने ग्रस्त असेल तर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने अशा रूग्णालयामधील उपचारांची शिफारस करण्याच्या अधीनतेने आणि केंद्र सरकारकडून अशा उपचारासंबंधी त्यांच्या कर्मचाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांसाठी मान्यता दिलेल्या अशा पध्दतीचे उपचार देणाऱ्या मुंबईतील एखाद्या रुग्णालयात, उपचार घेता येईल. कर्मचाऱ्याने स्वत:साठी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांसाठी अशा रुग्णालयात अशा उपचारासाठी कोणते शुल्क प्रदान केले असेल तर परिशिष्ट 'ड' मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये दाखल केल्यावर आणि मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रतिपूर्ती अनुज्ञेय असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अशी प्रतिपूर्ती मिळू शकेल. परंतु असे की, रुग्ण मासिक ६५० रुपये पेक्षा अधिक वेतन घेणारा कर्मचारी असावा किंवा अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यही नसावा, जो मोफत आहारासाठी पात्र असेल आणि त्याने बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयामध्ये उपचार घेतले असतील.

११. <u>संसर्गजन्य / संक्रमक रोगांचे उपचार:</u>

संसर्गजन्य रोगाने ग्रासलेल्या कर्मचाऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याला शासकीय किंवा महानगरपालिकेच्या संसर्गजन्य रोगांच्या रुग्णालयात किंवा अशा रुग्णालयाच्या स्वतंत्र कक्षात किंवा मुंबईच्या लगतचे क्षेत्र यामध्ये उपचार मिळू शकतात. अशा उपचारासाठी अशा रुग्णालयाकडून आकारलेले असे कोणतेही शुल्क आणि कर्मचारी किंवा त्याच्या कु टुंबाच्या सदस्यांकडून शुल्क आकारण्यात आले आणि संबंधित कर्मचाऱ्याद्वारे देण्यात आले तरी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकाकडून आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता झाल्यावर कर्मचाऱ्यास पूर्णपणे प्रतिपूर्ती मिळू शकते.

<u>स्पष्टीकरण:</u> या विनियमाच्या प्रयोजनार्थ संसर्गजन्य रोग याचा अर्थ कांजण्या, देवी, कॉलरा (पटकी), घटसर्प, कुष्ठरोग, गोवर, गालगुंड, प्लेग महामारी, आरक्त ज्वर, प्रलापक/ टाईफॉईड, डांग्या खोकला, प्रमस्तिष्क रोग (मॅनेनजाइटीस) , किंवा यासारखे राज्य शासनाने वेळोवेळी संसर्गजन्य रोग म्हणून जाहिर केलेले रोग, असा आहे.

१२. सेवेमध्ये असताना जर समजा कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर कौटुंबिक सदस्यांसाठी विशेष सवलत

सेवेमध्ये असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला अशा प्रसंगी दवाखाना किंवा बंदर मंडळ रूग्णालय किंवा इतर कोणत्याही रुग्णालयावत उपचार घेत असताना त्याच्या कुटुंबातील सदस्याना कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून तीन महिन्यापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी कर्मचाऱ्याच्या मृत्यूपूर्वी लागू असलेल्या ज्या अटी व शर्तीवर उपचार चालू होते त्याच अटी व शर्तीवर उपचार देणे कायम राहील.

१३. वैद्यकीय शुश्रूषा आणि उपचारामध्ये समाविष्ट नसलेल्या सेवांसाठी आकार

(१) मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडून या विनियमाअंतर्गत वैद्यकीय शुश्रूषा व उपचार विनाआकार घेण्यास रूग्ण हक्कदार असेल, परंतु वैद्यकीय शुश्रूषा व उपचारामध्ये समाविष्ट नसलेल्या सेवेसाठी आकार देण्यात आलेल्या सेवेचा यामध्ये समावेश केलेला नसेल आणि रूग्णाला जो आकार चुकता करावा लागेल.

(२) कोणतीही सेवा ही वैद्यकीय शुश्रूषा किंवा उपचारामध्ये समाविष्ट आहे किंवा नाही याबद्दल कोणताही प्रश्न उदभवल्यास, त्याचा निर्णय निर्दिष्ट अध्यक्षांद्वारे देण्यात येईल, जो अंतिम असेल.

१४. औषधांच्या पुरवठ्याची पध्दत, इत्यादी

वैद्यकीय अधिकारी, सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा तज्ज्ञ डॉक्टर यांच्याकडून विहित केलेली सर्व औषधे, अंतक्षेपक, लस, सेरा किंवा इतर उपचारशास्त्रीय पदार्थ, जर ती औषधे कर्मचाऱ्याला ज्या वैद्यकीय शुश्रूषा व उपचारासाठी ज्या दवाखान्यात भरती केले आहे त्या दवाखान्यात किंवा मुंबई बंदर रुग्णालयात उपलब्ध असतील तर यथास्थिति अशा रूग्णालय किंवा दवाखान्यात पुरवठा केला जाईल. परंतु असे की, जेव्हा कोणतीही औषधे, अंतक्षेपक, लस, सेरा किंवा इतर उपचारशास्त्रीय पदार्थ जर सामान्यपणे त्या दवाखान्यात, जेथे कर्मचाऱ्याने वैद्यकीय **शुश्रूषा** आणि उपचार घेण्यासाठी रूग्णालयात नोंदणी केलेली आहे, तेथे सामान्यत: उपलब्ध नसतील तर यथास्थिति त्या कर्मचाऱ्याला त्याच्या स्वत:च्या खर्चाने खरेदी करावी लागतील आणि तो मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून परिशिष्ट 'ख' मध्ये विहित केल्याप्रमाणे प्रमाणपत्र दिल्यावर त्याने खर्च केलेली रक्कम बंदर मंडळाद्वारे त्यास परत मिळू शकेल.

१५. रूग्णालयाची प्रतिपूर्ती इत्यादी शुल्क

रूग्णालयाने किंवा तज्ञांसाठी आकारलेले शुल्क प्रथमत: त्या कर्मचाऱ्याकडून रूग्णालयाला किंवा तज्ज्ञाला दिले जाईल आणि प्रारंभिक प्रसंगात यथास्थिति आणि परिशिष्ट 'ग' किंवा परिशिष्ट 'घ' मधील बंदर विश्वस्तमंडळाच्या नमुन्यातील परिशिष्ट 'ग' किंवा परिशिष्ट 'घ' मधील मर्यादांना अधीन राहून तो मागणी करू शकेल.

१६. प्रतिपूर्तीसाठी दिलेल्या मागणीची कालमर्यादा

विशिष्ट आजाराच्या संबंधात कर्मचाऱ्याकडून मागणी करण्यात आलेल्या प्रत्येक प्रतिपूर्तीच्या संबंधात त्याने उपचार पूर्ण झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत मागणी सादर करावी.

परंतु असे की, एखादी मागणी उक्त सहा महिन्यांच्या कालावधीच्या नंतर दाखल करण्यात आली असेल तर तो जेथे उक्त कालावधीमध्ये दावा दाखल करू न शकल्याच्या यथोचित कारणांस मुख्य वैद्यकीय अधिकारी सहमती देईल तेथे त्यानंतरची मागणी दाखल करून घेता येईल.

१७. परदेशी सेवांसाठी हस्तांतरण

परदेशी नियोक्त्याला परवडल्याशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्याचे परदेशात हस्तांतरण केले जाणार नाही. कर्मचारी, शक्य होईल तितपत, जर बोर्डाच्या सेवेत कार्यरत असेल तर या विनियमाअन्वये त्यांना मिळालेल्या विशेषाधिकारात व्यत्यय येणार नाही.

१८. अर्थउकल

या विनियमाच्या उकलीमध्ये जर कोणताही प्रश्न उद्‌भवला तर त्यावर अध्यक्षांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल.

१९. शिथिलतेचा अधिकार

जेथे अध्यक्ष समाधानी असतील की, कोणत्याही विशिष्ट प्रकरणामध्ये अनुचित क्लिष्टता आलेली असेल, तेथे अशा विनियमाच्या कोणत्याही कार्यात, तो लेखी नोंदीसह कारणांची मागणी करेल किंवा अशा नियमांचे पालन करणे आवश्यक असेल आणि असे उपवाद व अटी न्याय्य रीतीने सोडवण्यासाठी आवश्यक आहे असे समजले जाईल.

२०. निरसन व व्यावृत्ती

(१) या विनियमाच्या प्रारंभास प्रत्येक नियम, विनियम किंवा आदेश तात्काळ अंमलात आणण्याअगोदर शक्य होईल तितपत या विनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींसह तरतूद अंमलात राहणार नाही.

(२) जुने नियम, विनियम, निर्णय किंवा आदेशान्वये काहीही केले किंवा कोणतीही कृती केली असली, तरीही या विनियमाच्या तत्सम तरतुदीअंतर्गत करण्यात आले आहे किंवा हाती घेण्यात आले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट 'क'

दवाखान्यांची सूची

(विनियम २ चा खंड (३) पहा)

१. बॅलार्ड इस्टेट डिस्पेंसरी, २ रा मजला, ठाकरसी हाऊस, ग्राहम रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०००००१.
२. प्रिन्सेस डॉक डिस्पेंसरी, प्रिन्सेस डॉक दवाखाना इमारत, पी. डीमेलो रोड, मुंबई ४०००००९.
३. डॉकयार्ड दवाखाना, ढोलकर मार्ग, मुंबई ४०००१०.
४. कॉटन ग्रीन डिस्पेंसरी, २/२, झाकेरिया बंदर मार्ग, मुंबई ४०००१५.
५. वडाळा दवाखाना, वडाळा दवाखाना इमारत, रेनॉल्ड मार्ग, मुंबई ४०००३७.
६. ॲन्टॉप व्हिलेज डिस्पेंसरी, नाडकर्णी पार्क, ॲन्टॉप व्हिलेज, मुंबई ४०००३७.

उप-दवाखाने

१. पिर पाव डिस्पेन्सरी, कंबाईन इमारत, पिर पाव मॅनिफोल्ड, चेंबूर, मुंबई ४०००५४.
२. बूचर आयलँड डिस्पेंसरी, बूचर आयलँड
३. कुलाबा डिस्पेंसरी, बी पी टी रेक्रियेशन्स क्लब इमारत, दुमायने रोड, कुलाबा, मुंबई ४००००५.

परिशिष्ट 'ख'

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री / श्रीमती / कुमारी _____

विभागाच्या _____अनुभागामधील _____म्हणून सेवानियुक्त श्री. / श्रीमती / कुमारी _____यांची पत्नी / मुलगा / मुलगी/ वडील / आई आहे.

मी प्रमाणित करतो की, रुग्णावर मी / वैद्यकीय अधिकाऱ्याने _____ दवाखाना / सहायक मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने उपचार केले होत आणि खाली दिलेली औषधे मी / त्यांनी / तज्ज्ञ डॉक्टर _____यांनी विहित केलेली, रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा / रोगास प्रतिबंध होण्यासाठी आवश्यक होती.

मी पुढे असेही प्रमाणित करतो की, सदर औषधे ही रुग्णालयामध्ये किंवा बंदर विश्वस्त मंडळ रुग्णालयामध्ये जेथे रुग्ण हा वैद्यकीय शुश्रूषा व उपचाराच्या हेतूने नोंदणीकृत / दाखल झाला आहे तेथे संग्रहालयामध्ये उपलब्ध नव्हती आणि त्यामध्ये समान उपचारशास्त्रीय मूल्याचे स्वस्त पर्यायी पदार्थ, जसे की, साधारणपणे अन्न, टॉनिक, स्वच्छतागृहे व जंतुनाशके अंतर्भूत नाहीत.

औषधांची नावे:

१.

२.

३.

४.

दिनांक:

सही

सहायक मुख्य वैद्यकीय अधिकारी

मुख्य वैद्यकीय अधिकारी

परिशिष्ट 'ग'

(विनियम ५ चे उपविनियम (२) पहा)

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री. / श्रीमती / कुमारी _____

विभागाच्या _____अनुभागामधील _____म्हणून सेवानियुक्त

श्री. / श्रीमती / कुमारी _____यांची पत्नी / मुलगा / मुलगी/ वडील / आई आहे.

मी प्रमाणित करतो की, रुग्णास निर्दिष्ट केलेले डॉक्टर _____

विशेषज्ञांकडून विचारविनिमयाद्वारे डॉक्टर _____, वैद्यकीय अधिकारी, _____

दवाखाना / रुग्णालय बंदर विश्वस्त मंडळ, माझ्या मान्यतेसह आणि तज्ञ डॉक्टर _____

ची सेवा जेथे रुपये _____इतका खर्च झाला तो रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा / रोगापासून प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक होता.

मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याची सही

दिनांक:_____

परिशिष्ट 'घ'

(विनियम ६ चे उप विनियम (२) पहा)

शासकीय, महानगरपालिका किंवा खाजगी रुग्णालयातील कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यांची वैद्यकीय शुश्रूषा आणि / किंवा उपचाराशी संबंधित वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागणीसाठी आवेदनपत्राचा नमुना.

एन बी: प्रत्येक रूग्णासाठी वेगळा नमूना वापरण्यात यावा.

१.	कर्मचाऱ्याचे नाव आणि पदनाम (ब्लॉक अक्षरात)	:	
	विवाहित किंवा अविवाहित	:	
	जर विवाहित असाल तर पत्नी / पती कर्मचारी असेल तर पती / पत्नी कोणत्या ठिकाणी कर्मचारी आहे	:	
२.	अशा कर्मचाऱ्याचा अनुभाग व विभाग	:	
३.	कर्मचाऱ्याचे वेतन	:	
४.	मूळ निवासाचा पत्ता	:	
५.	रूग्णाचे नाव आणि तिचे / त्याचे कर्मचाऱ्याशी नाते	:	
	एन. बी: मुलांच्या बाबतीत वयाचा उल्लेख सुध्दा करावा		
६.	रूग्ण आजारी पडल्याचे ठिकाण	:	
७.	आजाराचे स्वरूप आणि कालावधी	:	
८.	खर्च केलेल्या रकमेचा तपशील	:	
	एक. **वैद्यकीय शुश्रूषा**		
	(एक) रोगनिदानाच्या सल्ल्याचे शुल्क	:	
	(क) सल्ला घेतलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव आणि पदनाम आणि त्याच्याशी संलग्न असलेले रूग्णालय.	:	

	(ख) सल्ला दिल्याचा क्रमांक आणि दिनांक आणि प्रत्येक सल्ल्यासाठी दिलेले शुल्क	:	
	(ग) अंत:क्षेपणाची (इंजेक्शन) संख्या व दिनांक आणि अंत:क्षेपणासाठी दिलेले शुल्क	:	
	(दोन) रोगनिदान करावयाच्या दरम्यान घेतलेल्या विकृतीजन्य, जीवाणुशास्त्र, किरणोत्सारी किंवा इतर तत्सम चाचण्यांसाठी शुल्क	:	
	(क) रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव किंवा जेथे चाचण्या करण्यात आलेल्या आहेत; आणि	:	
	(ख) वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विचारविनियमानंतर घेतलेल्या सल्ल्यावर करण्यात आलेल्या तपासण्या किंवा कसे. तसे असेल तर अशा अर्थाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे	:	
	(तीन) बाजारातून खरेदी केलेल्या औषधाचे शुल्क (औषधाची यादी आणि कॅश मेमो जोडण्यात यावे)	:	
	दोन. **<u>रूग्णालय उपचार</u>** रूग्णालयाचे नाव वेगवेगळी शुल्क आकारणी दर्शवणारे रुग्णालयात उपचारासाठी शुल्क	:	
	(एक) स्थान / निवासव्यवस्था	:	

	(कर्मचाऱ्याच्या वेतनानुसार होते किंवा नाही आणि वेतनानुसार हक्कदार असलेल्या निवास व्यवस्थेच्या अधिक असेल तर प्रमाणपत्र संलग्न करावे की योग्य तो निवास प्रकार उपलब्ध नव्हता).		
	(दोन) आहार	:	
	(तीन)शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचार	:	
	(चार) विकृतीशास्त्र, जीवाणूशास्त्र, किरणोत्सारी किंवा दर्शविणाऱ्या इतर तत्सम चाचण्या	:	
	(क) रुग्णालयाचे नाव किंवा अशी प्रयोगशाळा	:	
	(ख) जर अशा प्रकरणाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्यावर करण्यात आलेल्या चाचण्या आहेत किंवा कसे? तर प्रमाणपत्र जोडण्यात यावे.	:	
	(पाच) औषधे	:	
	(सहा) विशेष औषधे (औषधांची यादी व कॅश मेमो जोडण्यात यावा)	:	
	(सात) सामान्य शुश्रूषा	:	
	(आठ) विशेष शुश्रूषा अर्थात रूग्णासाठी विशेषकृत परिचारिका कर्मचारी, जर अशा प्रकरणाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्यावर भर्ती करण्यात आलेल्या आहेत किंवा कसे, तर प्रमाणपत्र जोडण्यात यावे.	:	
	(नऊ) रुग्णवाहिका शुल्क (प्रवास कोठून कोठपर्यंत झाला याचा उल्लेख करावा)	:	
	(दहा) कोणतेही इतर शुल्क अर्थात विद्युत, दिवे, पंखे, वातानुकूलन इत्यादी	:	

	तीन. **तज्ज्ञाकडून सल्ला :** दर्शविलेल्या प्रकरणाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या बरोबर तज्ज्ञाला दिलेले शुल्क	:	
	(क) तज्ज्ञाचे नाव व पदनाम आणि त्यास संलग्न रुग्णालय	:	
	(ख) सल्ल्याची संख्या व दिनांक आणि प्रत्येक सल्ल्यासाठी शुल्क	:	
९.	खर्च केलेली एकूण रक्कम	:	
१०.	सहपत्रांची यादी	:	

प्रतिज्ञापत्र

मी हे सुनिश्चित करतो की, आवेदनपत्रातील विवरण माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य आहे.

दिनांक:_____ कर्मचाऱ्याची सही

परिशिष्ट 'ड'

(विनियम ६ चे उपविनियम (२) च्या खालील टिप १ पहा)

(१) विनियम ६ च्या उपविनियम (२) मधील तिसऱ्या परंतुकाअन्वये कर्मचारी स्वत:च्या किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य यांच्या कोणत्याही शस्त्रक्रियेवरील खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रयोजनासाठी शस्त्रक्रियांचे त्यांच्या स्वरूपावर अवंलबून तीन वर्गामध्ये विभाजन करण्यात येईल तो खालीलप्रमाणे:

(क) सौम्य

१. टॉन्सिलेक्टोमी
२. नाकाच्या पडद्याची दुरूस्ती
३. कानाची साधी सौम्य शस्त्रक्रिया
४. नाल / नाडीव्रण वेधन
५. छातीचे चूषण
६. श्वसनी / अन्ननलिका तपासणी
७. अस्थिभंगाची दुरूस्ती
८. लेप (प्लॅस्टर) लावणे
९. शुक्रवाहिनी छेद
१०. मध्यच्छद उदभवन
११. विस्फारण आणि धारा (स्त्री रोग विज्ञान)
१२. सौम्य अंगच्छेद
१३. नेत्रच्छेदावरील शस्त्रक्रिया

(ख). मध्यम

१४. मूळव्याध
१५. स्त्री वंध्यकरण
१६. मोतीबिंदू निरसन करणे
१७. अंडवृध्दी शस्त्रक्रिया
१८. अंतर्गळ शस्त्रक्रिया
१९. अंतपुच्छ उपच्छेदन
२०. अधर निलंबन
२१. भगंदर
२२. तंतुपुटीचे निरसन करणे
२३. मोठे अवयवच्छेदन

(ग). मोठे

<u>शस्त्रक्रिया</u>

२४. पित्ताशय
२५. जठर
२६. वृक्क आणि
२७. पाठीचा कणा स्तंभ
२८. कर्नमुळ शस्त्रक्रिया
२९. मोठ्या आतड्याचे आंशिक उच्छेदन
३०. खंडच्छेदन
३१. थोरॅकोप्लास्टी
३२. छातीचे आंशिकउच्छेदन
३३. मणक्याची मागील कमान कापून टाकणे
३४. गर्भाशय काढणे
३५. स्प्लेमेक्टोमी
३६. अस्थी प्रतिरोपण
३७. चलनवलनाच्या मोठ्या दुरुस्तीसाठी अस्थिव्यंग शस्त्रक्रिया

(१) वरील वर्गीकृत यादी केवळ विशदीकरणात्मक आहे आणि परिपूर्ण नाही.

(२) जर एखाद्या प्रकरणाची गुंतागुंत किंवा त्याच्या इतर परिचर्येच्या परिस्थितीची खात्री केली तर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याला विशिष्ट शस्त्रक्रियेसाठी एका वर्गातून इतर वर्गामध्ये हस्तांतरण करण्याचा अधिकार असेल. करण्यात येईल.

२. सर्वसाधारण नियमाप्रमाणे प्रत्येक वर्गाच्या शस्त्रक्रियेसाठी प्रतिपूर्तीच्या आधारासाठी जास्तीत जास्त शुल्क घेतले जाईल. ते खालीलप्रमाणे असेल :

शस्त्रक्रियेचा वर्ग	जास्तीत जास्त		
	शस्त्रक्रियागृहाचे शुल्क (रू)	शल्यचिकित्सकाचे शुल्क (रू)	बधिरीकरण तज्ञाचे शुल्क (रू)
(अ) लहान	३०	१५०	३०
(ब) मध्यम	५०	३००	६०
(क) मोठे	७५	६००	१२०

(१) जर एखाद्या प्रकरणाची गुंतागुंत किंवा त्याच्या इतर परियर्चेच्या परिस्थितीची खात्री केली तर मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याला वरील दरांमध्ये बदल करण्याचा अधिकार असेल.

(२) उपरोक्त करण्यात आलेल्या शल्यचिकित्सक शुल्कामध्ये आवश्यक ते शस्त्रक्रियेनंतरचे उपचार आणि रुग्णालय किंवा शुश्रूषालयामध्ये रुग्णाला त्याच्या नियमित भेटी यांचा समावेश असेल.

(३) नियमानुसार औषधे, औषधीद्रव्ये, अंतक्षेपण आणि रक्तसंक्रमण यांस अतिरिक्त परवानगी दिली जाईल

(c6/pss/medical attendance regulation,1976)